# मन अमर आहे

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १०–०२–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

मानवाने केलेल्या वैज्ञानिक प्रगतीच्या मुळाशी जिज्ञासा हा मानवी मनाचा गुणधर्म आहे. ज्ञात असलेल्या विषयांच्या मुळापर्यंत पोहोचण्याची आणि अज्ञात विषयांची उकल करून घेण्याची जिज्ञासा मानवी मनाला असते. यातूनच मृत्यूनंतर काय? अशी जिज्ञासा उत्पन्न झाली. हिंदू तत्त्वज्ञानात मृत्यूनंतरच्या जीवनाला विशेष महत्त्व आहे. 'थिऑसॉफिकल सोसायटी' आणि 'सायकिकल रिसर्च' सारख्या अनेक संस्थांनी तसंच अनेक व्यक्तींनी या विषयावर बरंच संशोधन केलं आहे. मृत्यूनंतरच्या जीवनावर संशोधन करून लिहिलेले असंख्य ग्रंथ आज उपलब्ध आहेत. भारतातही काही व्यक्तींनी या विषयावर अभ्यासपूर्वक पुस्तकं लिहिली आहेत. अध्यात्म–विज्ञान हे मनाचं सर्वस्पर्शी विज्ञान असल्या कारणाने त्यात मृत्यूनंतरच्या जीवनावरही बरच संशोधन केलं गेलं आहे. अध्यात्म–विज्ञानाप्रमाणे परलोकस्थ व्यक्तींशी संपर्क साधण्याचे प्रामुख्याने चार भाग पडतात. पहिला प्रकार म्हणजे 'प्लँचेट'. अध्यात्म–विज्ञानाप्रमाणे हा सर्वात निकृष्ट प्रकार आहे. या प्रकारात बोलावण्यात आलेल्या परलोकस्थ व्यक्तीला आपण 'आत्मा' म्हणून संबोधू. मात्र बोलावलेला आत्माच येईल याची खात्री नसते. दुसरं म्हणजे मिळालेली माहिती शंभर टक्के बरोबर असेलच असं नाही. पुढील तीनही प्रकारांसाठी माध्यम असलेल्या व्यक्तींची आवश्यकता भासते. संवेदनशील व्यक्तीच माध्यम बनू शकतात. पाश्चात्य देशांमध्ये व्यवसाय म्हणूनही माध्यम बनणाऱ्या व्यक्ती असतात. दुसऱ्या प्रकारात अशा व्यक्ती मोडतात. या व्यक्तींच्या शरीरात परलोकस्थ आत्म्यांना बोलावलं जातं आणि हवी ती माहिती मिळवली जाते. तिसरा प्रकार म्हणजे 'मुक्त लेखन' (ऑटो राईटींग). यात आत्मे केवळ माध्यमाच्या हाताचा ताबा घेऊन माहिती लिहितात. चौथ्या प्रकारात माध्यमाला आत्म्याची गत जन्मीची धूसर आकृती दिसते. आत्म्याचे संवाद तितक्याच गतीने लिहून घ्यावे लागतात. या प्रकारात आत्म्याचा माध्यमाच्या शरीराला यत्किंचितही स्पर्श होत नाही. याचाच अर्थ मृत्यूनंतरही आत्म्यासोबत मनाचं अस्तित्व असतं. मन (अंत:करण) विरल्या शिवाय त्यात बद्ध असलेल्या आत्म्याची सुटका होत नाही. अध्यात्म –विज्ञानाप्रमाणे 'जर आत्मा अनादी अनंत असेल तर मन देखील अनादी अनंतच आहे'. अशा सर्वव्यापी मनाचाच विचार आपण या सदरात करणार आहोत.